# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.09.2025** **वारःरविवार**

---

१.पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आसाममध्ये 18 हजार 530 कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करणार

२. हिंदी दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन; गांधीनगरमध्ये आयोजित पाचव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा करणार उद्घाटन

ब्रिटनमध्ये लंडन इथं स्थलांतरितांच्या विरोधात काढण्यात आलेल्या मोर्चात लाखों नागरिकांचा सहभाग आणि

३. मर्यादित २० षटकांच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईमध्ये भारत पाकिस्तान आमने-सामने

**<u>पंतप्रधानआसाम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आसाममध्ये 18 हजार 530 कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकासाच्या महत्त्वाच्या प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. पहिला कार्यक्रम दरांग इथं होणार आहे, त्यामध्ये दरांग वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय तसंच शाळा आणि नर्सिंग महाविद्यालयासह विविध प्रकल्पांची पंतप्रधान मोदींच्या हस्ते पायाभरणी करण्यात येणार आहे. याशिवाय गुवाहाटी रिंगरोड प्रकल्प, ब्रह्मपुत्रा नदीवर उभारण्यात येणाऱ्या कुरुवा-नारेंगी यासारख्या वाहतुकीच्या सोयींमध्ये वाढ करणाऱ्या प्रकल्पांचीही त्यांच्या हस्ते पायाभरणी होणार आहे. याशिवाय स्वच्छ ऊर्जेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं हाती घेण्यात आलेल्या गोलाघाट इथल्या आसाम बायोइथेनॉल प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकल्पाचं उद्घाटन आणि नुमालीगड रिफायनरी लिमिटेडच्या पॉलिप्रॉपिलीन प्रकल्पाची पायाभरणी करतील.

तत्पूर्वी काल सायंकाळी पंतप्रधान मोदी भारतरत्न पुरस्काराने सन्मानित विख्यात गायक-संगीतकार, भूपेन हजारिका यांच्या जन्मशताब्दीनिमित्त गुवाहाटी इथं आयोजित समारंभात सहभागी झाले. दिवंगत भूपेन हजारिका यांची गाणी यापुढेही भारतीयांना जोडण्याचं काम करत राहतील तसंच यापुढेही त्यामुळे लोकांना ऊर्जा मिळत राहील असे गौरवोद्गार  पंतप्रधानांनी यावेळी काढले. या कार्यक्रमात हजारिका यांच्या स्मरणार्थ काढण्यात आलेल्या शंभर रुपयांच्या नाण्याचं पंतप्रधान मोदींच्या हस्ते अनावरण करण्यात आलं तसंच या दिग्गज संगीतकाराच्या २१ भाषांमधील चरित्राचंही त्यांनी प्रकाशन केलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मिझोराम, मणिपूरलाही भेट दिली. या दौऱ्यात पंतप्रधानांनी ७ हजार ३०० कोटी रुपयांच्या १४ वेगवेगळ्या प्रकल्पांचं भूमिपूजन केलं तसंच  चुराचंदपूर जिल्ह्यात जाहीर सभेला संबोधित केलं. विकासाच्या मार्गावर चालण्यासाठी शांतता आवश्यक आहे. आपली स्वप्नं साकारण्यासाठी आणि मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी शांततेच्या मार्गावर चालावं असं आवाहन त्यांनी या सभेत मणिपूरमधल्या सर्व गटांना केलं.

**<u>हिंदीदिवस</u>**

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यापासून ते आणीबाणीच्या कठीण काळात हिंदी भाषेनं महत्त्वाची भूमिका बजावली होती. हिंदीचं देशातल्या विविध भाषा आणि बोलीभाषा जोडणारा सेतू म्हणून महत्त्वाचं स्थान आहे. आज ती तंत्रज्ञान, विज्ञान आणि संशोधनाची भाषा बनली आहे असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज साजऱ्या होत असलेल्या हिंदी दिवसानिमित्त दिलेल्या संदेशात केलं. १९४९ मध्ये या दिवशी संविधान सभेनं देवनागरी लिपीत लिहिलेल्या हिंदीला देशाची अधिकृत भाषा म्हणून स्वीकृती दिली होती. त्यानिमित्त हा दिवस दिंदी दिन म्हणून साजरा केला जातो. आज, हिंदी ही जगात सर्वाधिक प्रमाणात बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी एक असून ५२ कोटींहून अधिक लोकांची ती प्रथम भाषा आहे. यानिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज गुजरातमध्ये गांधीनगर इथं पाचव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं उद्घाटन करतील. केंद्र सरकारच्या विविध विभागांमधील जवळपास ७ हजार कर्मचारी संमेलनात सहभागी होणार आहे

**<u>इंट्रो-जीएसटी-</u>**

केंद्र सरकारनं वस्तु आणि सेवा कर प्रणालीतील नुकत्याच जाहीर केलेल्या सुधारणांमुळे सामान्य नागरिकांना दिलासा मिळणार आहे. औषधे, दूध, रोजच्या वापरातील खाद्यपदार्थांवरील जीएसटी दर कमी होणार आहेत.   याबाबत पुण्याचे   जीवराज चोले यांची ही प्रतिक्रिया..

**<u>नड्डा</u>**

केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांच्या हस्ते एम्स दिशा ॲपचं काल नवी दिल्लीत उद्घाटन करण्यात आलं. रुग्ण, अभ्यागत आणि कर्मचाऱ्यांसाठी हे ॲप्लिकेशन तयार करण्यात आलं आहे. यामध्ये डिजिटल नकाशे वापरले आहेत. या ॲपमुळे डॉक्टरांच्या केबिन शोधण्यात होणारा विलंब टाळता येणार आहे. तसंच रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येकाला याद्वारे   मार्गदर्शन मिळण्यास मदत होणार आहे.

**<u>स्थानिक कलाकारजाजू</u>**

प्रादेशिक आणि स्थानिक आशय आणि महसूल निर्माण होण्यासाठी स्थानिक कलाकार आणि आशय निर्मात्यांना दूरदर्शन आणि आकाशवाणी केंद्रांशी जोडण्याची गरज माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी काल व्यक्त केली. जाजू यांनी काल लखनऊ आकाशवाणी कार्यालयात मंत्रालयाच्या विविध माध्यम विभागांच्या कामाचा आढावा घेतला. त्यावेळी बोलताना माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अखत्यारीतले विभाग केवळ सामान्य नागरिकांशीच जोडलेलेच नाहीत तर देशाच्या दुर्गम

भागात देखील त्यांचा खोलवर प्रसार असल्यानं हे विभाग सरकारचा चेहरा आहेत असे कौतुकोद्गार जाजू यांनी यावेळी काढले.

**वैष्णोदेवी**

जम्मू आणि काश्मीरमध्ये, रियासी जिल्ह्यात अनेक दिवसांपासून सुरू असलेली श्री माता वैष्णोदेवी मंदिराची मुसळधार पावसामुळे स्थगित केलेली यात्रा आजपासून पुन्हा सुरू होणार होती, परंतु पावसाची संततधार अजूनही सुरू असल्यानं ही यात्रा पुढील आदेशापर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. श्री माता वैष्णोदेवी मंदिर मंडळाने काल सोशल मीडिया पोस्टद्वारे ही घोषणा केली. गेल्या महिन्याच्या २६ तारखेला मुसळधार पावसामुळे मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात भूस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, त्याच्या काही तास आधी मंदिराची पवित्र यात्रा तात्पुरती थांबवण्यात आली होती.

**बिहारएनआयए**

राष्ट्रीय तपास संस्थेनं काल बिहारमधील किशनगंज इथं पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या बंदी घालण्यात आलेल्या संघटनेच्या अध्यक्षाला अटक केली. २०२२ मध्ये झालेल्या फुलवारी शरीफ गुन्ह्याचा कट रचल्याप्रकरणी ही अटक करण्यात आली आहे. मेहबूब आलम उर्फ मेहबूब आलम नदवी असं या आरोपीचं नाव असून तो मोतीहारी जिल्ह्यातल्या हसनगंज भागातील रहिवासी आहे. शांतता आणि सलोखा भंग होईल अशा देशविरोधी कारवाया करून सार्वजनिक अशांतता निर्माण करण्याच्या उद्देशानं हा कट रचण्यात आला होता. त्याप्रकरणी स्थानिक पोलिसांनी २६ जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला होता, मेहबूब आलम हा त्यातील १९ वा आरोपी आहे.

**लंडनमोर्चा**

ब्रिटनमधील स्थलांतरित आणि इस्लामविरोधी कार्यकर्ते टॉमी रॉबिन्सन यांनी आयोजित केलेल्या निदर्शनांचा एक भाग म्हणून काल सेंट्रल लंडनमध्ये काढण्यात आलेल्या मोर्चात एक लाखांहून इंग्लंड आणि ब्रिटनचे झेंडे घेऊन सहभागी झाले होते. पोलिसांच्या अंदाजानुसार जवळपास एक लाख दहा हजार नागरिकांचा या स्थलांतरितांच्या निषेधार्थ काढण्यात आलेल्या मोर्चात सहभाग होता. तर त्याला विरोध करण्यासाठी जवळपास 5,000 लोकांचा जमाव जमला होता. या दोन गटांमध्ये संघर्ष होऊ नये यासाठी मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी काही प्रतिबंधित भागांमध्ये मोर्चेकऱ्यांनी जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला.

**क्रिकेट**

आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेमध्ये आज संध्याकाळी दुबई इथं अ गटात भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. हा सामना रात्री ८ वाजता सुरू होईल. गेल्या फेब्रुवारीनंतर पहिल्यांदाच हे दोन्ही संघ एकमेकांच्या समोर मैदानात उतरणार आहेत. दोन्ही संघांनी आपापले पहिले सामने जिंकून स्पर्धेत चांगली सुरुवात केली आहे. दरम्यान काल रात्री अबू धाबी येथे झालेल्या गट 'ब' सामन्यात श्रीलंकेने बांगलादेशवर सहा गडी राखून विजय मिळवला.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या महिला क्रिकेट संघांच्या मर्यादित षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना आज चंदीगड इथं होणार आहे. दुपारी दीड वाजता हा सामना सुरू होईल. या महिन्याच्या अखेरीस सुरू होणाऱ्या आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवरदोन्ही संघांसाठी ही मालिका महत्वाची ठरणार आहे.

**<u>बॉक्सिंग</u>**

जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताच्या जस्मीन लैम्बोरिया हिनं सुवर्णपदक पटकावले. तिने ५७ किलो वजनी गटात पोलंडच्या ज्यूलियाचा पराभव केला.

**<u>हॉकी</u>**

हॉकीमध्ये आज संध्याकाळी हांग्झो येथे महिला आशिया चषक विजेतेपदाच्या लढतीत भारत आणि चीन यांच्यात सामना होणारआहे. सायंकाळी साडेपाच वाजता हा सामना सुरू होणार आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं ,नमस्कार.